**निशाणी क्रमांक – ११५.**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६

## मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की –

माझे नांव – सुरेखा जालिंदर मरेवाड,

वय – ६० वर्षे धंदा – घरकाम,

रा. लिंगधाळ, ता.अहमदपूर, जि. लातूर.

### शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे

[फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २७३ अन्वये]

**०१.** मी आरोपींना ओळखते. आरोपी क्र.२ न्यायालयात हजर आहे. आरोपी क्र.१ च्या गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी ११३ वर आहे. फिर्यादी ही माझी मुलगी आहे. फिर्यादीचे लग्न दिनांक ०८.०५.२०१७ रोजी येणगेवाडी येथे आरोपी क्र.१ सोबत झाले. एक वर्ष आरोपींनी फिर्यादीस चांगले नांदवले. लग्नामध्ये फिर्यादीच्या वडीलांनी ११ लाख हुंडा व २२ तोळे सोने घातले होते व आमचा त्याव्यतिरीक्त ७ लाख लग्न खर्च झाला होता. त्यानंतर फिर्यादीचे सासू, सासरे, ननंदा व नवरा हे ननंदा वेळअमावस्याच्या सणानिमित्त आल्यानंतर तिला पतीच्या धंद्यासाठी रुपये १० लाख माहेरावरून घेऊन ये असे म्हणू लागले. त्यासाठी तिला ते उपाशी ठेऊ लागले, मारहाण करू लागले व तिचा शारिरीक व मानसिक त्रास करू लागले. फिर्यादीला आरोपी 'तु काय चांगल्या खानदानाची आहेस का, तुला चांगला स्वयंपाक येत नाही' असे सारखे म्हणून तिचा छळ करू लागले. फिर्यादी आरोपींना लग्नामध्ये सामान दिल्याने माझ्या वडीलांकडे पैसे नाहीत, त्यांची ऐपत नाही ते तुम्हाला पैसे देऊ शकत नाहीत असे म्हणत असे. आरोपी तिला खुप मारत असत, त्रास देत असत. फिर्यादीने ते कुणाला सांगू नये याकरीता आरोपी क्र.१ ने तिच्याकडून

**निशाणी क्रमांक – ११५.**

मोबाईल काढून घेतला. तिला त्रास सहन न झाल्याने ति लिंगधाळ येथे माहेरी आली. तिने आल्यानंतर आम्हाला सर्व सांगितले. फिर्यादीचे वडील काही दिवसांनी आमचे नातेवाईक नामे गुंडेराव मरेवाड, संदीपान गुरमे, प्रल्हाद गुरमे, मुरहरी नागमे यांना घेऊन ते फिर्यादीच्या सासरी येणगेवाडी येथे गेले. फिर्यादीचे वडील आरोपींना लग्नामध्ये खुप खर्च झालेला आहे. तुम्ही मागत असलेले पैसे देण्यास माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणाले. फिर्यादीच्या वडीलांनी आरोपी क्र.१ चे मामा नामे विनोद येमले, रा.कुरळा ज्यांनी सोयरिक केली होती त्यांना समजावून सांगण्यासाठी बोलावून घेतले. त्याठिकाणी आरोपी फिर्यादीच्या वडीलांना म्हणाले की, ‘तुम्ही तुमच्या मुलीला नौकरी सोडायला लावा, चार दिवसांनी आणून सोडा आम्ही नांदवू' असे म्हणाले. फिर्यादीच्या वडीलांनी फिर्यादीला नौकरी सोडायला लावली. चार दिवसांनी फिर्यादीचे वडील वरील सर्व नातेवाईक व मित्र घेऊन फिर्यादीला नांदायला सोडण्यासाठी तिच्या सासरी घेऊन गेले. फिर्यादीचे वडील आरोपींना मुलीला चांगले नांदवा असे म्हणून फिर्यादीला सासरी सोडून वापस आले. सर्व आरोपी फिर्यादीला पैसे घेतल्याशिवाय यायचे नाही असे म्हणाले होते म्हणून त्यांनी फिर्यादीला पुन्हा पैसे न घेता का आली म्हणून उपाशी ठेवायला मारहाण करून शारिरीक व मानसिक त्रास द्यायला सुरूवात केली. आरोपी क्र.१ फिर्यादीला नेहमीच लाथा बुक्क्यांनी मारहाण करत व शिव्या देत असत. एक दिवस फिर्यादीने तिच्या ननंदा सासू, सासरे हे सर्व घरात असताना त्यांच्यासाठी स्वयंपाक केला, जेवायला वाडले. त्यानंतर तिने स्वतःसाठी ताट वाढून घेतले. त्यावेळी आरोपी क्र.१ आला व त्याने तिच्या समोरील ताट उचलून घेतले व तिला तु असेच उपाशी रहा तुला जेवायला मिळणार नाही असे म्हणाला. तिला मारयला व शिव्या द्यायला सुरूवात केली. रात्री १०.३० वाजता

**निशाणी क्रमांक – ११५.**

फिर्यादीची सासू आली व ती फिर्यादीला तुला पैसे घेऊन यायला सांगितले होते, तु पैसे घेऊन आली नाही, घरात राहू नको असे म्हणू लागली. तिचा अवाज ऐकून आरोपी क्र.१ तिथे आला. त्याने फिर्यादीला खुप मारहाण करण्यास सुरू केली. तिच्या ओरडण्याचा आवाज बाहेर जाईल म्हणून तिच्या सासूने हात फिर्यादीच्या तोंडावर ठेवला. फिर्यादीला जिवे मारतील असे वाटल्याने तिने कसा तरी घरातून पळ काढला. तिचा अवाज ऐकून तंटामुक्तीचे अध्यक्ष कमलाकर येणगे, बाळू येणगे व गावातील इतर मंडळी तिथे आली. त्यांनी रात्रीच फिर्यादीला लिंगधाळ माहेरी आणून सोडले. त्यांनी घडलेला सर्व प्रकार आम्हाला सांगितले व ते निघून गेले. त्यानंतर फिर्यादी व तिच्या वडीलांनी जाऊन पंचायत समिती मदत केंद्र येथे तक्रार दिली. फिर्यादीच्या सासरच्यांना तिथुन नोटीस पाठवली असता ते जाणिवपुर्वक तिथे हजर झाले नाहीत.

०२. एके दिवशी मी, माझे पती व फिर्यादी घरात बसलो असताना अचानक दुपारी दोन वाजता फिर्यादीचे सासू, सासरे, ननंदा व पती आमच्या घरी आले. ते आम्हाला तुमच्या मुलीला नांदवायचे असेल तर १० लाख द्या, नाही तर फारकत द्या आम्हाला दुसरे लग्न करायचे आहे असे म्हणू लागले. आरोपी क्र.१ आम्हाला व इतर सगळ्यांना खुप शिव्या देऊ लागला. फिर्यादी आरोपी क्र.१ यास माझ्या आईवडीलांना शिव्या का देत आहात असे म्हणाली. तसे म्हणाल्यानंतर सगळ्या आरोपींनी फिर्यादीस मारण्यास सुरूवात केली. आरोपी त्यावेळी फिर्यादीला नांदवणार नाही, काय करायचे ते करा, तुम्हाला कुठे जायचे तिथे जा आमचे काही वाकडे होत नाही असे म्हणू लागले. इतर गावातील लोक जमा झाले व ते आरोपींना समजावण्याचा प्रयत्न करू लागले. आरोपींनी इतर कुणाचेही न ऐकता तुमच्या

मुलीला तुम्ही ठेवून घ्या असे म्हणून तिथुन निघुन गेले. फिर्यादी व तिच्या वडीलांनी जाऊन पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

**०३.** फिर्यादीला सन २०१८ मध्ये पहिल्यांदा आरोपींनी आणुन सोडले होते. फिर्यादीच्या वडीलांना ते दुखः सहन झाले नाही. त्यामुळे ॲटक येऊन ते सन २०१९ मध्ये मयत झाले. आरोपी क्र.१ ने दुसरे लग्न केलेले आहेत. आम्ही आरोपींकडे फारकत मागत आहोत पण आरोपींना त्यांनी दुसरे लग्न केल्याने फारकत द्यायची गरज वाटत नाही.

**<u>आरोपी तर्फे उलट तपास श्री महालिंगे डी.पी. यांच्या मार्फत सुरू–</u>**

**०४.** माझे शिक्षण १२ वी झालेले आहे. जालिंदर मरेवाड हे माझे पती होते. गुंडेराव मरेवाड हे माझे दिर आहेत. संदीपान गुरमे, प्रल्हाद गुरमे, मुरहारी नागमे, कमलाकर येणगे हे आमचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे त्या सर्वांसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे लग्न झाल्यानंतर फिर्यादी व आरोपी क्र.१ हे हडको नांदेड येथे जॉब करत होते. हे म्हणणे खरे आहे की, तिथे आरोपी क्र.१ लाही जॉब होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला त्यावेळी एम.आय.डी.सी. नांदेड येथे एका कंपनीत जॉब होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांना जॉब असल्यामुळे लग्नानंतर लगेचच ते दोघे नांदेड येथे गेले. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना सुट्टी मिळत नसल्याने ते सण वारानिमित्त फिर्यादीच्या सासरी येत असत. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर तिन वर्ष फिर्यादी व आरोपी क्र.१ नांदेड येथे जॉब करत होते.

**०५.** फिर्यादीला मारहाण कोणत्या तारखेला झाली ते मी निश्चीत सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ आंधळी आहे. फिर्यादीचे वडील

**निशाणी क्रमांक – ११५.**

आरोपींना समजावण्यासाठी पहिल्यांना सन २०१८ मध्ये गेले होते, त्याची निश्चीत तारीख मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला आरोपींनी मारहाण केली, उपाशी पोटी ठेवले हे मी खोटे सांगत आहे. फिर्यादी सन २०१९–२० पर्यंत नांदेड येथे नौकरी करत होती किंवा कसे ते मला सांगता येत नाही.

०६. 'त्यानंतर तिने स्वतःसाठी ताट वाढून घेतले. त्यावेळी आरोपी क्र.१ आला व त्याने तिच्या समोरील ताट उचलून घेतले' असे मी पोलीसांना सांगितले होते किंवा कसे ते मला आठवत नाही. आता मला माझा जबाब वाचून दाखवण्यात आला. त्यामध्ये वरील मजकूर नमूद नाही. तो का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी ही नांदेड येथे राहत असल्याने तिचा सासरच्या लोकांशी कधी संपर्क आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला कधीही मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचा स्वभाव रागिट आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी विभक्त राहत असल्याने सासरी ज्यायचे नाही असा हट्ट धरत होती. माझे पती नौकरीस होते. आम्ही आरोपीस दिलेली ११ लाख रूपये रक्कम रोख स्वरूपात दिली होती. आम्ही घरचे सोने विकून त्याचे पैसे करून आरोपीला दिले होते. आम्ही नांदेड येथील पुष्पा ज्वलर्स मध्ये सोने विकून पैसे दिले होते. आम्ही सोने विकल्यानंतर त्याची पावती होती किंवा कसे ते माझ्या पतीला माहीत होते, मला माहीत नाही. आम्ही ज्यांच्याकडून सोने घेतले होते ते दुकानदार आमचे नातेवाईक होते. आम्ही २२ तोळे सोन्याचे पैसे दिले होते. सोने आरोपींनी आम्ही दिलेल्या पैशातून करून घेतले होते. २२ तोळे सोन्याच्या आमच्या पावत्या आहेत किंवा कसे ते आमचे पती मयत झाल्याने सांगू शकत नाही. ७ लाख रुपये आम्ही लग्नामध्ये संसार उपयोगी वस्तू, लग्नाच्या वऱ्हाड्याचे येणे जाणे

**निशाणी क्रमांक – ११५.**

इत्यादीसाठी खर्च केले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सर्व ननंदाचे लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सर्व ननंदा त्यांच्या नवऱ्याच्या घरी नांदतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी तिला तु चांगल्या खानदानाची नाहीस असे म्हणून त्रास देत असल्याचे आम्हाला फिर्यादीने सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला आरोपींपासून फारकत पाहिजे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे फिर्यादीला नांदायला पाठवायची आमची इच्छा नाही. आरोपी क्र.१ ने दुसरे लग्न केल्याबाबत आमच्याकडे पुरावा नाही. आरोपींच्या सांगण्यावरून फिर्यादीने कधी नौकरी सोडली याची तारीख मला सांगता येत नाही. फिर्यादीने नौकरी सोडल्याबाबत राजीनाम्याचा कागद मला मिळाल्यास मी दाखल करू शकते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आरोपी क्र.१ विरूध्द कौटुंबिक न्यायालय, नांदेड येथे पोटगीची केस केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आरोपी क्र.१ ने नांदायला येण्यासाठी कौटुंबिक न्यायालय, नांदेड येथे केस केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये फिर्यादीला नांदायला न्यावे असे कोर्टाने आदेश केला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, आरोपी क्र.१ ने दुसरे लग्न केल्याने फिर्यादी आता नांदायला तयार नाही. आरोपी क्र.१ कौटुंबिक न्यायालय नांदेड येथे फिर्यादीला नांदायला नेण्यासाठी एक तारीख ठेवली होती त्या तारखेला ते तिथे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, या गुन्ह्यातील तपास चालू असताना फिर्यादी नांदेड येथे जॉबला होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी फक्त शहरात राहिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापूर्वी फिर्यादी १५ वर्षे नौकरी करेल असे बोलणे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ ला दुसरा भाऊ नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ चा आईवडील वयोवृध्द आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ ही

**निशाणी क्रमांक – ११५.**

आंधळी आहे व तिला स्वतःची कामे करता येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ एकुलता एक असल्याने त्याच्यावर त्याच्या आईवडीलांची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जबाबदारीमुळे आरोपी क्र.१ ला खेड्यात रहावे लागत होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीला नौकरी सोडून खेड्यात रहायचे होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचा खेड्यात न राहण्याचा हट्ट असल्याने ती सासरी नांदली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी तिच्या सासू सासऱ्यांना उलटे बोलत होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी नांदेड येथे राहत असताना तिथे आरोपी क्र.१ ला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीचा मानसिक व शारिरीक त्रास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मुलीला चांगले न नांदवल्याने ॲटक येऊन वारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ आजही फिर्यादीला नांदवण्यास तयार आहे पण ती जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ आजही फिर्यादीकडे फारकत मागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने दुसरे लग्न केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीकडे किंवा आमच्याकडे रुपये १० लाखांची मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला कसलाही त्रास दिलेला नसताना फिर्यादीच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपींविरूध्दचा सर्व मजकूर खोटा आहे.

उलटतपास नाही. फेर तपास काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.11.01 17:08:04 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०१.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.